# देव आम्हांला मेंढपाळ देतो आमचे मेंढपाळ आम्हांला एकमेकांवर प्रीती करुन सेवा करण्यास साहाय्य करतात.

**प्रार्थना:** ''हे आमच्या पित्या, आमचे मित्र-मैत्रीणीही येशूवर प्रेम करतात, त्यांच्या बद्दल आम्ही तुझे आभार मानतो. इतरांची सेवा करण्याद्वारे तुझी सेवा करण्यास आमचे साहाय्य कर. येशूच्या नावातं मागितले म्हणून ऐक, आमेन.''

पाहा लूक 15:1-7 मध्ये दुबळया किंवा हरवलेल्या लोकांची काळजी सात्विक-देवभीरु पुढारी कशा प्रकारे घेतात.

उत्तम मेंढपाळाचा कथावृत्तांत सांगा. मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी लूक 15:1-7 मधून उत्तम मेंढपाळाचा कथावृत्तांत्त सांगावा.



**प्रश्न:** पुढील प्रश्न मुलांना विचारुन त्यांना उत्तरे देण्यास सांगा.

- कोणत्या लोकांना येशूचे बोलणे ऐकायला आवडत असे? (येशू या जगात असताना जकातदार हे सर्वात वाईट-दुष्ट लोक होते हे स्पष्ट करुन सांगा).
- येशूचा द्वेष करणारे आणि वारंवार त्याच्याविषयी वाईट गोष्टी बोलणारे कोण लोक होते? (परुशी लोक वरुन धार्मिकपणाचा आव आणित कारण लोकांनी आपली प्रशंसा करावी असे त्यांना वाटे, परंतु अंतरंगात, त्यांच्या अंत:करणांत अनेक वाईट गोष्टी होत्या. हे स्पष्ट करा).
- मेंढपाळाने त्याची मेंढरे मोजली तेव्हा त्यात किती मेंढरे कमी होती?
- त्या एका हरवलेल्या मेंढरासाठी मेंढपाळाने काय केले?
- मेंढपाळाला हरवलेले मेंढरु सापडल्यावर त्याने त्याचे मित्र व शेजाृयांना बोलावून काय केले.

हरवलेल्या मेंढराच्या कथावृत्तांताचे **नाट्यीकरण करा.** याचा चांगला सराव करुन उपासनेच्या वेळी ते प्रौढांसमोर सादा करा.

- **मोठया मुलाने वा प्रौढाने मेंढपाळाची** भूमिका करावी.
- राहिलेल्या बाकीच्या मुलांनी **शेजारी (दोघेजण). मेंढरे** आणि **हरवलेले मेंढरु** ह्या भूमिका कराव्यात. त्यांनी तोंडाने ''बें बें'' असा आवाज काढून ओणवे होऊन रांगत चालावे.

**मेंढपाळ, मेंढरे व हरवलेले मेंढरु :** खोलीच्या एका बाजूने दुसृया बाजूला हळूहळू जा.

**हरवलेले मेंढरु :** मागे रेंगाळा, मग एकदम मागे फिरुन पट्कन दृष्टी आड व्हा.

**मेंढपाळ :** तुमच्या मेंढरांकडे पाहा, मनातल्या मनात त्यांची मोजणी करताना प्रत्येक मेंढराकडे बोट दाखवा. मोठयाने म्हणा, ''अरेरे! एक मेंढरु दिसत नाही, हरवले बहुतेक!''

(आजूबाजूला पाहा, लोकांच्या मधून फिरा, खुर्च्यांच्या मागे शोधा व मेंढराला हाका मारा).

**शेजारी :** (मोठयाने) ''मेंढपाळ दादा, काय शोधत आहात?''

**मेंढपाळ :** ''माझे लहानसे मेंढरु हरवले. ते शोधत आहे!'' मग ते हरवलेले मेंढरु गेले त्या दिशेने जा आणि त्याला घेऊन या (शक्य असल्यास उचलून घ्या). आनंदाने शेजाृयांना हाक मारुन सांगा, ''या, या माझे हरवलेले मेंढरु सापडले बघा! चला माझ्या बरोबर तुम्हीही आनंद करा!''

**शेजारी :** मोठयाने आनंदाचा गजर करा आणि मेंढपाळाबरोबर जा.

- मुलांना या कथावृत्तांता विषयी प्रौढांना प्रश्न विचारण्यास सांगा. वर दिलेले **प्रश्न** त्यांना विचारता येतील.



मेंढीचे चित्र काढा. मुलांनी त्यांचे चित्र प्रौढांना दाखवावे. आणि आपण देवाची मेंढरे असून आमच्याकरीता आपला प्राण देणारा येशू उत्तम मेंढपाळ आहे हे स्पष्ट करुन सांगा.

**कविता :** चार मुलांनी उपासनेच्या वेळी प्रौढांसमोर स्तोत्र 78:2, 4, 52 व 72 ही वचने म्हणावीत किंवा गाऊन दाखवावीत :

मी आपले तोंड उघडून दाखले सांगेन,
प्राचीन काळच्या गूढ गोष्टींचे निवेदन करीन.
त्या गोष्टी आम्ही त्यांच्या वंशजांपासून गुप्त ठेवणार नाही.
तर परमेश्वराची स्तुत्य कृत्ये, त्याच्या पराक्रम आणि त्याने
केलेली अद्‌भुत कृत्ये पुढच्या पिढीला सांगू.
पण त्याने आपल्या लोकांस मेंढरांसारखे बाहेर आणून
त्यांस कळपाप्रमाणे रानातून नेले.
आणि त्याने आपल्या मनाच्या सरळतेने त्यांचे पालन केले.

आपल्या हाताच्या चातुर्याने त्यांस मार्ग दाखवला. हरवलेल्या नाण्याच्या **दृष्टांताचे** प्रात्यक्षिक दाखवा.



- मोठया मुलाने **लूक 15:8-10** हा शास्त्रभाग वाचावा. त्याच वेळी एक मुलगी काही तरी हरवलेली गोष्ट शोधण्याचा अभिनय करीत येते.
- वाचन झाल्यावर ती मुलगी झाडू घेऊन झाडते.
- अचानक तिला नाणे मिळते, ती झाडू टाकून आनंदाने उडया मारते.



**पाठ करा** योहान 10:27 मोठया मुलांनी योहान 10:27 व 28 ही वचने पाठ करावीत.

**प्रार्थना :** ''हे पित्या, मेंढपाळ आपल्या मेंढरांची काळजी घेतो त्याप्रमाणे आम्हीही एकमेकांची देखभाल करावी-काळजी घ्यावी यासाठी आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net